ISSN 2231-6671
International Registered and Recognized
Research Journal Related to Higher Education for all Subjects

# Hi-TECH
# RESEARCH ANALYSIS

EDITOR IN CHIEF
DR. BALAJI KAMBLE

Issue : XIII, Vol. III
HI-TECH RESEARCH ANALYSIS
IMPACT FACTOR 3.22
ISSN 2231- 6671
Feb. 2017 To July 2017

# INDEX



| Sr. No. | Title of Research Paper | Author(s) | Page No. |
|---|---|---|---|
| 1 | Black Money & Indian Economy | Prof. Dr. S. R. Jagtap | 1 |
| 2 | From Jane Doe to Jane Austin Challenging society's perception in Orthodox England | Pandurang Mamadge | 9 |
| 3 | Diasporic Consciousness in the Novel of Jhumpa Lahiri's The Lowland | Prof. Sanjay M. Suryawanshi | 14 |
| 4 | Consortia for Professionals and Adcadmic Librarians | Prof. V. N. Hangargelar | 21 |
| 5 | प्रेमचन्द युग मे स्त्री चेतना | प्रा. डॉ. जानअहेमद के. जे. | 28 |
| 6 | यशपाल के उपन्यास और जनवादी चेतना | प्रा. यु. ए. बिरादार | 33 |
| 7 | महाराष्ट्रातील लोकसंख्येचा भौगोलिक अभ्यास | प्रा. गोविंद रामराव मुंढे | 36 |
| 8 | शेतकऱ्यांच्या आत्महत्या राजकीय व्यवस्थेसमोरील गंभीर आव्हान | प्रा. वसंत रंगनाथ डावरे | 43 |
| 9 | मानवी हक्क व लोकप्रशासनाची भूमिका | प्रा. बळवंत विष्णू घोगरे | 48 |
| 10 | महिलांच्या सबलीकरणामध्ये शिक्षणाचे महत्व | डॉ. आप्पासाहेब हुंब्बे | 52 |



S.P.Mahavidyalaya, Bhoom
Bhoom
Tq.Bhoom Dist.O.bad

10

# महिलांच्या सबलीकरणामध्ये शिक्षणाचे महत्व

डॉ. आप्पासाहेब हुंब्बे
क्रिडा विभाग प्रमुख,
शंकरराव पाटील महाविद्यालय,
भूम, जि. उस्मानाबाद

## Research Paper - Phy. Education

**प्रस्तावना**

शिक्षण हे समाज परिवर्तनाचे एक महत्वपूर्ण साधन आहे. शिक्षणाच्या माध्यमातून समाजाचा विकास साधता येतो. हे ओळखून स्वातंत्र्यपूर्व काळापासुन समाज सुधारकांनी स्त्री शिंक्षणाची चळवळ सुरू केली. वैदिक काळातील संपूर्ण सामाजिक जीवनात स्त्री-पुरूष समानता होती. परंतु मध्ययुगाच्या कालखंडात ही समानता नष्ट होवून धर्माने स्त्रियांच्या शिक्षणाचा अधिकार नाकारला होता. त्यामुळे स्त्री अज्ञानाच्या अंधःकारात आणि सनातनी समाजाच्या सामाजिक प्रथा, परंपरांच्या बंधनात जगत होती. पुरूषस्य वाक्यम् प्रमाणम असेच ती मानत आली आहे.

अन्यायाविरूद्ध लढण्यासाठी प्रथम अन्यायाची जाणीव व्हावी लागते. स्त्रियांची ही जाणीवच बोथट झाली होती. ही जाणीव स्त्रियांच्यामध्ये निर्माण करण्याचे प्रमुख कार्य शिक्षणाने केलेले आहे. स्वातंत्र्यपूर्व काळापासुन स्त्री शिक्षणाची ही चळवळ महात्मा जोतीराव फुले, सावित्रीबाई फुले, महर्षी धोंडो केशव कर्वे या समाज सुधारकांनी केली. या ज्ञानरूपी चळवळीच्या वृक्षाला आलेले फळ म्हणजे कल्पना चावला व सुनिता विल्यम्स होत.यावरून स्त्रिच्या अबला कडून सबला पर्यंतच्या प्रवासाची प्रचिती येते.

शिक्षण हा देशाचा, समाजाचा व व्यक्तीच्या जीवनाचा गाभा आहे. एखादा समाज सुसंस्कृत आणि पुरोगामी आहे हे त्या समाजात स्त्री शिक्षणाला दिलेल्या महत्वावरून ठरते. स्त्रियांच्या

S.P. Mahavidyalaya, Bhoom
Bhoom
Tq. Bhoom Dist. O.bad

विकासावर समाजाचा विकास अवलंबुन असतो. कारण स्त्रियांचे शिक्षण कुटूंबव्यापी असते. म्हणजेच एक स्त्री शिकली तर संपूर्ण कुटूंब सुशिक्षित होते. या दृष्टीने स्त्री शिक्षणाला अधिक महत्व प्राप्त झाले आहे.

**संशोधनाची उद्दिष्ट्ये**

१. शिक्षणाच्या माध्यमातून घडून आलेल्या स्त्री विकासाचा आणि स्त्री सबलीकरणाचा आढावा घेणे.

२. स्त्री शिक्षणातील उणिवा जाणून घेवून त्यावर प्रभावी उपाययोजना सुचविणे.

**अभ्यास पध्दत**

प्रस्तुत लघुशोध निबंध हा दुय्यम स्वरूपाच्या माहितीवर आधारलेला आहे. सदरची माहिती ही विविध संदर्भ पुस्तके, मासिके, शोध निबंध यांच्या सहाय्याने मिळविलेली आहे. या शोध निबंधामध्ये शिक्षणाच्या माध्यमातून घडून आलेल्या स्त्री विकासाचा आणि स्त्री सबलीकरणाचा आढावा घेण्यात आला आहे.

**अभ्यासाचे महत्व**

मानवाचे संस्कारमय आणि संस्कारपूर्ण जीवन घडविण्यामध्ये शिक्षणाची भूमिका महत्वपूर्ण आहे. त्यामुळे व्यक्ती विकासाच्या आणि पर्यायाने सामाजिक विकासाच्या दृष्टीने शिक्षणाला महत्व प्राप्त झाले आहे. स्त्रियांच्या दृष्टीने तर शिक्षण हा परिवर्तन घडवून आणणारा एक महत्वाचा घटक आहे. शिक्षणामुळेच स्त्रियांना त्यांच्यातील शक्तीची खरी ओळख झालेली आहे. यातूनच त्यांचे सबलीकरण घडून आलेले आहे. स्त्रियांच्या या सबलीकरणामध्ये शिक्षणाने दिलेल्या या महत्वपूर्ण योगदानाचा आढावा घेण्यात आला आहे.

**शिक्षणातून स्त्री सबलीकरण**

मानवी जीवनाच्या प्रकृती, विकृती आणि संस्कृती या तीन पातळ्या आहेत. स्वतः भूक लागली की खाणे ही झाली प्रकृती. भूक नसताना आणि दुस-याला नागवून खाणे ही झाली विकृती. स्वतः ला भूक असताना दुस-या भूकेल्याला आपल्या भाकरीतली भाकरी देणे ही झाली संस्कृती. शिक्षणाने माणसाची विकृतीतून तर सुटका व्हावीच. पण प्रकृतीच्या आहारी न जाता संस्कृतीच्या दिशेने कुच करण्याची प्रेरणा निर्माण व्हावी हे शिक्षणाचे उद्दिष्ट आहे. शिक्षणाचे हे उद्दिष्ट साध्य करताना स्त्री विकासा बरोबरच स्त्री सबलीकरण आणि पर्यायाने सामाजिक विकास घडून आलेला आहे.

S.P.Mahavidyalaya,Bhoom
Bhoom
Tq.Bhoom Dist.O.bad

### १) स्त्री व्यक्तिमत्वाचा विकास

कोणतीही व्यक्ती जन्मतःच सर्वगुण संपन्न असत नाही. व्यक्तीची आवड, इच्छा-आकांक्षा लक्षात घेवून त्याच्या अंगभुत गुणांचा विकास घडवून आणावा लागतो. हा विकास घडवून आणण्यामध्ये शिक्षणाचे योगदान महत्वाचे आहे. व्यक्तिमत्वाला आकार देणारी नैतिक मुल्ये, मानवतावादी मुल्ये, जीवन विषयक दृष्टीकोन, चांगले आचार-विचार, संस्कार, वर्तणूक, सहकार्य, बंधुभाव, शिरत आदी घटक व्यक्तीमध्ये रूजविण्याचे कार्य शिक्षणच करते. शिक्षणाच्या या कार्यातूनच स्त्रियांच्या व्यक्तिमत्वाचा विकास घडून आलेला आहे.

### २) स्व अस्तित्वाची जाणिव

मध्ययुगीन कालखंडामध्ये स्त्रियांकडे भोगवादी दृष्टीकोनातून पाहिले जात होते. तिचा उपभोग घेता यावा यासाठी तत्कालीन पुरूषांनी त्यांच्या देहावर, मनावर, इच्छा-आकांक्षावर ताबा मिळविला होता. तिला ज्ञानापासून दूर ठेवून, पुरूषांची सेवा करण्यासाठीच तिचा जन्म झाला आहे असे तिच्या मनावर बिंबविण्यात आले होते. तिला यातून बाहेर काढण्यासाठी ती माणूस आहे याची जाणिव करून देणे भाग आहे. शिक्षणाने स्त्रिला स्व अस्तित्वाची जाणिव करून देण्याचे कार्य केले आहे. त्यामुळे तिच्यावर लादलेली बंधने तिने झुगारून देवून ती आज पुरूषांच्या बरोबरीने विविध क्षेत्रात कार्यरत आहे.

### ३) सामाजिक स्थानातील परिवर्तन

वैदिक काळात स्त्रिला पुरूषांच्या बरोबरीने समाजात स्वातंत्र्य, अधिकार आणि दर्जा दिला होता. त्यामुळे या कालखंडात गार्गी, मैत्रेयी, अत्रेयी, अपालघोषा अशा विद्वान स्त्रिया होवून गेल्या. परंतु त्यानंतरच्या कालखंडात स्त्रियांवर लादलेल्या बंधनामुळे आणि शिक्षणापासून त्याना वंचित ठेवल्यामुळे एकही विद्वान आणि पराक्रमी स्त्री होवू शकली नाही. मात्र स्वातंत्र्योत्तर काळात स्त्रियांच्यामध्ये मोठ्या प्रमाणात शिक्षणाचा प्रसार होवून त्यांचे समाजातील स्थान उंचावले आहे. समाजात स्त्रिया पुरूषांच्या बरोबरीने विविध कार्यात आणि विविध पदावर आपल्या भूमिका कार्यक्षमपणे पार पाडत आहेत.

### ४) विविध मुल्ये आणि मूलभूत हक्कांची जाणीव

समता स्वातंत्र्य, बंधुत्व, स्त्री-पुरूष समानता, राष्ट्रप्रेम, समुदाय जीवन, सहकार्य, बंधुभाव या मानवतावादी मुल्यांची आणि आचार-विचार, मतदान, भाषण, लेखन आणि संचार स्वातंत्र्य या मुलभूत हक्कांची जाणीव स्त्रिला शिक्षणाच्या माध्यमातून झालेली आहे. यामुळे आज स्त्री आत्मनिर्भर होवून ती आपल्या मुलभूत हक्कांचा वापर करत आहे. आपले विचार ती भाषण आणि लेखनाच्या

S.P.Mahavidyalaya, Bhoom
Bhoom
Tq.Bhoom Dist.O.bad

माध्यमातून मांडत आहे. संचार स्वातंत्र्यामुळे तिचे क्षेत्र आज व्यापक बनलेले आहे. तिच्यावर होणा-या अन्यायाला ती प्रतिकार करत आहे.त्यांच्या विरूध्द आवाज उठवत आहे.

**५) सुसंस्कारीत पिढी घडविण्यास योगदान -**

मुलांचे पालन-पोषण, संगोपन आणि संस्कारक्षम पिढी घडविण्याच्या कार्यामध्ये पुरूषापेक्षा स्त्रियांचा सहभाग सर्वाधिक आहे हे सर्वश्रूत आहे. अर्थात स्त्रिया सुशिक्षित असतील तर त्या संगोपनाचे आणि संस्काराचे कार्य चांगल्या प्रकारे करू शकतात. यांचा प्रत्यय मुबंईमध्ये झालेल्या एका सर्व्हेक्षणावरून दिसून आलेला आहे. ज्या माता सुशिक्षित आहेत त्यांच्यातील बालमृत्युचे प्रमाण कमी आहे असे या सर्व्हेक्षणावरून दिसून आले आहे. मुलांना वाढविताना त्यांच्यावर जे संस्कार केले जातात, मातेला जी मेहनत घ्यावी लागते त्याला तोड नाही. त्यामुळे अशा माता महान असतात. आज हजारो माता हे पिढी घडविण्याचे कार्य करत आहेत.

**६) सामाजिक प्रश्न सोडवण्यात महिलांची भूमिका -**

स्त्री शिक्षण आणि विविध सामाजिक समस्या यांचा निकटचा संबंध आहे. स्त्री शिक्षणाच्या प्रसारामुळे स्त्रियांमध्ये लोकसंख्या वाढ, हुंडाबळी, स्त्री अत्याचार, बालमृत्यु, स्त्रीभृणहत्या, आरोग्य, दारूबंदी, एड्स, भ्रष्टाचार या सामाजिक समस्या विषयी जाणीव निर्माण झालेली आहे. आज शिकलेली आणि नोकरी व्यवसायात गुंतलेली स्त्री आपले कुंटुंब लहान ठेवण्याचा प्रयत्न करत आहे. यामुळे लोकसंख्या वाढ रोखण्यास मदत झाली आहे. अनेक स्त्री संघटना स्त्री अत्याचार, हुंडाबळी विरूध्द लढा देत आहेत तर दारूबंदी घडवून आणली आहे. शिक्षणामुळे स्त्रियांच्या आरोग्य विषयक जाणीवात वाढ झालेली आहे. प्रकल्पग्रस्तांच्या मानवाधिकारासाठी झगडणा-या मेधा पाटकर यांच्या आंदोलनामुळे भारतातील सर्व सामान्याचा आवाज टिकुन आहे. सिंधुताई संकपाळ अनाथ मुलांच्या संगोपन कार्यात गुंतलेल्या आहेत. कनवाळू आई बनून वेश्यांच्या मुलांच्या शिक्षणासाठी धडपडणा-या विजयाताई लवाटे, विधवा आणि पतिता स्त्रियांची उध्दारकर्ती पंडीता रमाबाई, आदिवासी मुलांच्या अंगणवाडी शिक्षणाची धुरा सांभाळलेल्या अनुताई वाघ, अंधासाठी असामान्य काम करणा-या सामान्य व्यक्ती निलम कांगा, अपंगांचा आधार बनून काम करत असलेल्या नसिमा हुजरूक, पती-पत्नीचं संसारीक जीवन सुखमय करण्यासाठी झगडणा-या आणि समाजाने चोरीचा शिक्का मारलेल्या पारधी जमातीसह १९ भटक्या विमुक्त जातीच्या मुलासाठी शिक्षणांचे कार्य करणा-या ॲड.सौ. अपर्णा रामतिर्थकर आणि एड्स समस्येविषयी जनजागृती करत असलेल्या कराडच्या वैशाली शिंदे, अशा अनेक स्त्रियांनी सामाजिक समस्या निवारणाच्या कार्यामध्ये काम केलेले आहे आणि आजही करत आहेत. स्त्री शिक्षणाचे इष्ट परिणाम आणि त्यांचे सबलीकरण या त्यांच्या कार्यातुन आज दिसून येत

S.P. Mahavidyalaya, Bhoom
Bhoom
Tq. Bhoom Dist. O.bad

Issue - XIII, Vol. III
Hi-TECH RESEARCH ANALYSIS
IMPACT FACTOR 3.22
ISSN 2231- 6671
Feb. 2017 To July 2017


आहेत.

### ७) विविध क्षेत्रातील संधी आणि सहभाग

स्त्रियांनी शिक्षणाच्या सहाय्याने विविध कौशल्ये विकसित करून आपली कार्यक्षमता सिध्द केली आहे. त्यामुळे उद्योग, प्रशासन, माहिती-तंत्रज्ञान, व्यवस्थापन, राजकारण, कला आदी क्षेत्रात त्यांना अनेक संधी प्राप्त झालेल्या आहेत. त्यामुळे या क्षेत्रातील त्यांचा सहभाग दिवसेंदिवस वाढतच आहे. सुधा मुर्ती, किरण बेदी, मनिषा म्हैसकर, ललिता गुप्ते, प्रतिभा पाटील, सोनिया गांधी सुषमा स्वराज, मायावती, वसुंधरा राजे,फराह खान या स्त्रियांनी आपल्या वैशिष्ठ्यपूर्ण कार्य पध्दतीने आपल्या कार्यक्षेत्रात प्रभाव निर्णाण केलेला आहे. आज स्त्रियांचा सहभाग नाही असे एकही क्षेत्र नाही. विशेषतः आज बँकीग, आरोग्य, शिक्षण या क्षेत्रामध्ये स्त्रियांना नोकरीच्या संधी मोठ्या प्रमाणात उपलब्ध होत आहेत. शिक्षणाच्या माध्यमातून घडून आलेल्या विकासाची हीच फलश्रुती आहे.

### ८) स्वावलंबन -

स्वातत्र्यपूर्व काळात स्त्रियांना त्यांच्या गरजांची पूर्तता करण्यासाठी सर्वार्थाने कुंटूबावर किंवा पतीवर अवलंबून रहावे लागे. त्यांच्या सहकार्याशिवाय तिला आपल्या गरजा पूर्ण करता येत नव्हत्या. परंतू शिक्षणामुळे तिच्या अंगभूत गुणांचा आणि कौशल्यांचा विकास घडून आल्यामुळे त्याचा उपयोग ती अर्थार्जन करण्याच्या दृष्टीने करत आहे. लघुकर्ज घेवून स्त्रिया आज वेगवेगळे व्यवसाय करत आहेत. याचे एक उत्तम उदाहरण म्हणजे भारतातील महिला बचत गटांची चळवळ होय. आज या चळवळीत ४.५ कोटी महिला ३० लाख बचत गटांच्या माध्यमातून १८ हजार कोटींची उलाढाल करत आहेत. त्यामुळे तिचे पुरूषावरील अवलंबित्व कमी होवून ती स्वावलंबी होत आहे. या बरोबरच स्त्रिया विविध क्षेत्रात नोकरी ही करत आहेत.

### ९) स्त्री नेतृत्व

व्यक्तीच्या विविध अंगभूत गुणांमध्ये नेतृत्व हा एक महत्वाचा गुण असून त्याची उभारणी जिद्द, चिकाटी, संघटन कौशल्य, कष्टाळूपणा अशा विविध घटकावर अवलंबून असते. अशा सर्व गुण संपन्न स्त्रियांनी स्त्री नेतृत्वाची धुरा समर्थपणे सांभाळली आहे आणि आजही सांभाळत आहेत. राणी लक्ष्मीबाई, इंदिरा गांधी, विजयालक्ष्मी पंडित, कष्टकरी महिलांची तेजोमय पणती बनलेल्या इला भट, सारे काही स्वातंत्र्यासाठी मानणा-या म्यानमार मधील लोकशाही जनआंदोलनाच्या नेत्या स्यू की या महिलांनी स्त्री नेतृत्वाची उदाहरणे निर्माण केलेली आहेत.

### स्त्री शिक्षणातील उणिवा

एखादा समाज सुसंस्कृत व पुरोगामी आहे हे त्या समाजात स्त्री शिक्षणाला दिलेल्या

S.P. Mahavidyalaya, Bhoom
Bhoom
Tq. Bhoom

महत्वावरून ठरते. स्त्रियांच्या विकासावर समाजाचा विकास अवलंबुन असतो. कारण पुरूषांचे शिक्षण व्यक्ती पुरतेच मर्यादीत असते. परंतु स्त्री शिक्षण कुटूंबव्यापी असते. स्त्री शिक्षणाचे हे महत्त्व जाणूनही त्यांच्या शिक्षणाकडे म्हणावे तितके लक्ष दिले गेलेले नाही. त्यामुळे स्त्री शिक्षणातील उणिवा जाणून घेवून त्यावर प्रभावी उपाययोजना करणे आवश्यक आहे.

**१. कौटुंबिक उणिवा-**

आजही मुलीना कुटूंबात गौण स्थान दिले जाते. ती परक्याचे धन समजून तिच्यावर घरकाम, भावंडांचा सांभाळ ही कामे सोपविली जातात. यामुळे त्यांच्या शिक्षणाकडे दुर्लक्ष होते.

**२. सामाजिक उणिवा-**

मुलगा हा वंशाचा दिवा, म्हातारपणाचा आधार म्हणून मुलीपेक्षा श्रेष्ठ समजला जातो. याचा परिणाम मुलींच्या शिक्षणावर होतो. तिच्या शिक्षणावरील खर्च अनावश्यक, शिकलेल्या मुलीना जास्त शिकलेला नवरा शोधावा लागेल, हुंड्याचा खर्च, बालविवाह यामुळे त्यांच्या शिक्षणाची उपेक्षा होत आहे.

**३. आर्थिक उणिवा-**

आजही भारतात सुमारे २५ टक्के लोकसंख्या दारिद्र्य रेषेखाली जीवन जगत आहे. त्यामुळे सर्व सामान्य कुटूंबामध्ये मुली ऐवजी मुलाच्या शिक्षणाला प्राधान्य दिले जाते. हा शिक्षणातील प्रमुख अडसर आहे.

४. शिक्षणामधील मुलींच्या गळतीचे प्रमाणं सर्वात जास्त असल्यामुळे स्त्री शिक्षणाच्या सार्वत्रिकरणात अडचणी निर्माण होत आहेत.

५. उच्च शिक्षणातील स्त्रियांचा सहभाग कमी आहे.

**समारोप -**

शिक्षणामुळे संपूर्ण स्त्री जातीच्या विकासा बरोबरच समाजाचा विकासही घडून आला आहे. स्त्री शिक्षण आणि त्यातुन स्वावलंबन हा स्त्री सबलीकरणाचा आणि पर्यायाने सामाजिक विकासाचा पाया आहे. हे ओळखुनच प्रा. महम्मद युनुस यांनी निर्मिलेली ग्रामीण बॅंक, स्वयम् शिक्षण प्रयोग सारख्या सामाजिक संस्था आणि लाखो बचत गटांनी स्त्रियांना स्वावलंबी बनवून समाजाचा विकास घडवून आणला आणि स्त्रिला सबळ बनविले आहे.

**उपाययोजना -**

स्त्री शिक्षणातील उणिवा कमी करण्याच्या उद्देशाने आणि जास्तीत जास्त स्त्रियांना शिक्षणाचा लाभ मिळवून देण्याच्या उद्देशाने काही प्रभावी उपाययोजना मांडलेल्या आहेत.

S.P. Mahavidyalaya, Bhoom
Bhoom
Tq. Bhoom Dist. O.bad

Issue - XIII, Vol. III
Hi-TECH RESEARCH ANALYSIS
IMPACT FACTOR 3.22
ISSN 2231- 6671
Feb. 2017 To July 2017


१. मुलींचे कुटूंबातील स्थान आणि सामाजिक प्रतिष्ठा वाढविण्याच्या दृष्टीने लोकांचे सामाजिक प्रबोधन करून मुला-मुलींच्यावर समान दर्जाविषयी जन्मल्यापासून योग्य संस्कार केले जावेत.

२. सर्व माध्यमांचा व साधनांचा वापर करून स्त्री शिक्षणाचे महत्व पटवून देण्यासाठी सामाजिक प्रबोधनावर भर द्यावा.

३. शाळांमध्ये महिला शिक्षकाना प्राधान्य देवून मुलीना शैक्षणिक साहित्य मोफत पुरवावे. क्ष्यामुळे मुलींची उपस्थिती वाढून गैरसमज दूर होण्यास मदत होईल.

४. स्त्री शिक्षणाच्या विकासाच्या दृष्टीने काम करणा-या सामाजिक संस्था आणि लोकांना विविध पुरस्कारानी सन्मानित करून त्यांच्या कार्याला प्रोत्साहन द्यावे.

५. देश उभारणीच्या कार्यातील एक विकासात्मक काम म्हणून स्त्री शिक्षणाला राजकीय पक्षांनी प्राधान्याने अग्रक्रम द्यावा.

६. उच्च शिक्षणातील स्त्रियांचा सहभाग वाढविण्यासाठी सर्व स्तरातील महिलांना उच्च शिक्षणासाठी आणि संशोधनासाठी शिष्यवृत्ती देण्यात यावी.

## संदर्भ सूची :-

१. उषःकाल उद्याच्या शिक्षणाचा प्राचार्य रा. तु. भगत चैतन्य प्रकाशन, कोल्हापूर- १९९४.
२. त्या होत्या म्हणुन डॉ. विजया वाड - अनुश्री प्रकाशन, पुणे २००७.
३. स्त्रीचे भावविश्व आणि आधुनिकता प्रतिमा इंगोले - सोनल प्रकाशन,दर्यापूर १९९८.
४. आजही स्त्रीचे स्थान दुय्यमच - प्रतिमा इंगोले दिलीपराज प्रकाशन, पुणे २००१.
५. स्त्री शिक्षण चळवळीच्या योगदानातून सामाजिक विकास एक अभ्यास प्रा. व्ही. के. मोरे आणि प्रा. व्ही. एन. रोटे यांनी फेब्रुवारी २००८ मध्ये कडेगाव जि. सांगली येथे झालेल्या राष्ट्रीय परिषदेत सादर केलेला लघुशोध निबंध.

S.P.Mahavidyalaya, Bhoom Tq.Bhoom Dist.O.bad

PRINCIPAL
S.P.Mahavidyalaya,Bhoom
Dist.Osman...